**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

देवाची शपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | संतोष माधव ठोसर, |
| **वय** | : | ४३ वर्षे, |
| **व्यवसाय** | : | नोकरी, |
| **नेमणुक** | : | सहा.डाक, मुंबई जनरल पोस्ट ऑफीस, मुंबई. |

**<u>सरतपासणी — सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. ए. क्षीरसागरः</u>**

**१.** दिनांक २९/०४/२०१० रोजी दुपारी १२:३० वाजता शिक्रापुर पासुन दोन कि. मी. अंतरावर बोरमळा येथे सदरची घटना घडली होती. सदर दिवशी मी व आणि माझी मेव्हुणी नामे माधुरी शांताराम शिंदे असे आम्ही मोटार सायकल क्र. एम.एच.१२ ई.यु.७९५१ हिच्यावर बसुन मुखई या गावी चाललो होतो. त्यावेळी आम्ही शिक्रापुर येथील बोरमळा येथे आलो असता आमच्या पाठीमागुन येणारे एक पीकअप क्र. एम.एच. १२ एफ.डी. ०६४८ हिने पाठीमागुन आमच्या मोटार सायकलला धडक दिली. त्यामुळे आम्ही मोटारसायकलवरून खाली पडलो.

**२.** सदर अपघातामध्ये मला माझ्या उजव्या खांदयाला खरचटले व मुका मार लागला होता. माझी मेव्हुणी नामे माधुरी शिंदे हिच्या पायाला दुखापात झाली होती. त्यावेळी समोरून गाडीवर येणारे सुनिल होळकर यांनी आम्हाला ओळखले. सुनिल होळकर यांनी पीकअप चालक यास थांबवले होते. त्यानंतर सुनिल होळकर यांनी मला व माझी मेव्हुणी नामे माधुरी शिंदे यांना वैद्यकीय उपचारकामी सुर्या हॉस्पीटल, शिक्रापुर येथे त्यांच्या पीकअप गाडीमध्ये घेवुन आले.

**३.** अपघातानंतर माझा शिक्रापुर पोलिसांनी दिनांक २९/०४/२०१० रोजी घटनेबाबत खबरी जबाब नोंदविला होता. आता मला सदरचा खबरी जबाब दाखविण्यात आला. सदर जबाबावर माझी सही असुन त्यातील संपुर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. सदर खबरी जबाबास **<u>निशाणी क्र.पी—१८</u>** देण्यात आली. मी घटनेच्या वेळेस पीकअप क्र. एम.एच. १२ एफ.डी. ०६४८ हे चालवित असलेल्या वाहन चालकास आज रोजी ओळखु शकत नाही. (आरोपीचे सन्मानिय विधिज्ञ न्यायालयात हजर असुन त्यांनी निशाणी क्र. १६ सदर आरोपीचा गैरहजरी माफीचा अर्ज दिलेला

असुन सदर आरोपीच्या गैरहजरीमध्ये पुरावा घेण्यास परवानगी मागीतली व सहमती दर्शवली. त्यामुळे सदर आरोपीच्या गैरहजरीमध्ये पुरावा नोंदविण्यात आला.) **सरतपास पुर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री.जी. ई. दरेकर :**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ वाहनांची वर्दळ असल्यामुळे वाहनांचा वेग साधारणपणे कमी असतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या आजुबाजुला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी अपघात कसा झाला होता हे निश्चितपणे मी आजरोजी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरून अनेक पीकअप वाहने हे ये—जा करीत असतात. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना घडली होती, त्यावेळेस मी पीकअपचा क्रमांक पाहिला नव्हता. मला सदर अपघातातील पीकअप गाडीची माहिती सुनिल होळकर यांच्याकडुन समजली होती. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्या वेळेस घटनास्थळावर खड्डे होते.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी सुनिल होळकर यांच्या सांगण्यावरून निशाणी क्र. १८ वरील खबरी जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १८ वरील जबाबानंतर पोलिस हे माझ्याकडे कधीही सदर गुन्हयाच्या चौकशीकामी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ज्या मोटारसायकलवर चाललो होतो ती मोटारसायकल खड्डयामुळे घसरून पडल्यामुळे आम्ही खाली पडलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/०४/२०१० रोजी आमच्या मोटारसायकलला कोणत्याही पीकअप वाहनाने धडक दिलेली नाही.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक २९/०४/२०१० रोजी पीकअप वाहन क्र. एम.एच.१२ एफ.डी. ०६४८ हिने पाठीमागुन आमच्या मोटारसायकलला धडक दिलेबाबत खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातामध्ये माझ्या उजव्या खांदयाला खरचटले आणि मुकामार लागला होता हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मेव्हुणी नामे माधुरी शिंदे हि देखील पायाला मार लागल्याबाबत खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, समोरून

गाडीवर येणारे सुनिल होळकर यांनी आम्हाला ओळखले आणि सुनिल होळकर यांनी पीकअप चालक यास थांबवले होते हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सुनिल होळकर यांनी मला व माझी मेव्हुणी नामे माधुरी शिंदे यांना वैदयकिय उपचारकामी सुर्या हॉस्पीटल, शिक्रापुर येथे त्यांच्या पीकअप गाडीमध्ये घेवुन आले हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

DOMALE
DATTATRAYA
BHAUSAHEB
2025.01.16 04:02:25
+0530

ठिकाण: शिरूर.
दि. १६/०५/२०२५

**(द.भा.डोमाळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी,ता.शिरूर, जि.पुणे .